

# दि विनर करिअर अकॅडेमी अमरावती

गाडगे नगर पूनम फोटो स्टूडियो लाईन अमरावती

## पोलीस भरती सराव प्रश्न पेपर क्र. 53

संपर्क: 9834036854 / 9284080660

(संचालक - धिरजकुमार)

एकूण प्रश्न : १००

वेळ : 90 मिनिट

गुण: १००

1) विशेषणाचा प्रकार ओळखा? 'काळा घोडा'
(1)संख्यावाचक विशेषण (2)गुणवाचक विशेषण
(3)संबंधी विशेषण (4)आवृत्ती वाचक विशेषण

---

2) 'मराठी भाषेचे पणिनी' खालीलपैकी कोणास म्हणतात?
(1)विठ्ठल रामजी शिंदे (2)विष्णू शास्त्री चिपळूणकर
(3)दादोबा पांडूरंग तर्खडकर (4)गोपाळ गणेश आगरकर

---

3) 'चांदण्या रात्रीचा पंधरवडा' या शब्दसमुहास योग्य शब्द निवडा?
(1)शुक्लपक्ष (2)कृष्णपक्ष (3)पाक्षिक 4) वद्यपक्ष

---

4) रिकाम्या जागेसाठी सर्वात योग्य शब्द निवडा?
दुष्काळाच्या झळांनी मानवी जीवन........... . गेले होते.
(1)भाजून (2)करपून (3)विटून (4)मरून

---

5) रामास वनवास मिळाला. अधोरेखित शब्दाची विभक्ती सांगा?
(1)प्रथमा (2)तृतीया (3)चतुर्थी (4)पंचमी

---

6) खालील शब्दांतून 'मुलगी' या शब्दासाठी पर्यायी शब्द निवडा?
(1)नंदन (2)स्त्री (3)तनुजा (4)लोक

---

7) 'भाजीपाला' शब्दांचा विग्रह कसा होईल?
(1)भाजी + पाला (3)भा + जीपाला (2)भाजई + पाला (4)भाजी पाला वगैरे

---

8) 'कोळसा उगाळावा तितका काळाच' या म्हणीचा योग्य अर्थ द्या ?
(1)कोळसा काळा असतो (2)वाईटाचा रंग काळा असतो
(3)वाईट वाईटच (4)चांगलेही वाईट होते

---

9) 'मिशी भादरणे' या वाक्यप्रकाराचा योग्य अर्थ द्या ?
(1) मिशी काढून टाकणे (2)मिशी कातरणे
(3) मिशी वाढविणे (4)बेअब्रु करणे

---

10) अधोरेखित शब्दाची जात ओळखा? 'अबब! केवढा मोठा साप हा !"
(1)शब्दयोगी अव्यय (2)क्रियापद
(3)केवलप्रयोगी अव्यय (4)उभयान्वयी अव्यय

---

11) 'तू तेथून निघून जा !' या वाक्याचा प्रकार ओळखा?
(1)मिश्रवाक्य (2)प्रश्नार्थक वाक्य (3)आज्ञार्थी वाक्य (4)संयुक्त वाक्य

---

12) रामाने रावणाला मारले. या वाक्यातील प्रयोग ओळखा?
(1)कर्तरी प्रयोग (2)कर्मनी प्रयोग (3)भावे प्रयोग (4)संकिर्ण प्रयोग

---

13) लंकेची पार्वती या वाक्यप्रचाराचा योग्य अर्थ द्या?
(1)अनंलकृत स्त्री (2)अलंकार विरहीत स्त्री (3)श्रीमंत स्त्री (4)दरिद्री स्त्री

14) पुढील वाक्याचा प्रकार ओळखा 'पूर वाढू लागला व लोकांची भितीने गाळण उडाली'
(1)केवलवाक्य (2)संयुक्त वाक्य (3)मिश्र वाक्य (4)प्रधानवाक्य

---

15) 'उपसर्ग' शब्दांना केव्हा लागतात?
(1)पुर्वी (2)नंतर (3)शब्दाबरोबर (4)शब्दांना लागत नाही

---

16) 'पाणी दिले म्हणून झाडे जगली' या वाक्यातील म्हणून हे कोणते अव्यय आहे?
(1)कारणाबोधक (2)परिणामबोधक (3)उद्देशबोधक (4)संकेतबोधक

---

17) 'सहावा' हे खालीलपैकी कोणत्या प्रकारचे संख्याविशेषण आहे?
(1)गणनावाचक (2)क्रमवाचक (3)आवृत्तीवाचक (4)यापैकी नाही

---

18) 'पक्षी झाडावर बसतो' या वाक्यातील शब्दयोगी अव्यय ओळखा?
(1)पक्षी (2)झाड (3)वर (4)बसतो

---

19) 'त्याने सर्व पेरू खाल्ले' या वाक्यातील विशेषणाचा प्रकार ओळखा?
(1)अनिश्चित संख्यावाचक (2)संख्यावाचक
(3)गणनावाचक (4)आवृत्ती वाचक विशेषण

---

20) 'प्रामाणिकपणा' हे कोणते नाम आहे?
(1)सामान्यनाम (2)विशेषनाम (3)भाववाचक नाम (4)व्यक्तीवाचक नाम

---

21) खालीलपैकी कोणता शब्द सामान्यनाम आहे?
(1)महाराष्ट्र (2)धृतराष्ट्र (3)देवराष्ट्र (4)परराष्ट्र

---

22) खालीलपैकी नामसाधित विशेषण ओळखा?
(1)सातारी पेढे (2)तोंडाळ बाई (3)कोल्हापुरी चप्पल (4)वरील सर्व

---

23) संगिताने स्वयंपाक केला. या वाक्यातील विधेय ओळखा?
(1)संगिता (2)संगिताने स्वयंपाक (3)स्वयंपाक (4)स्वयंपाक केला

---

24) 'मांजर' या नामाचे अनेकवचन करा?
(1)मांजर (2)मांजरी (3)मांजरांना (4)अनेकवचन होत नाही

---

25) 'शीतोष्ण, आत्मोन्नती' हे शब्द शब्दसंधीच्या कोणत्या प्रकारातील आहेत
1) स्वरसंधी 2) विसर्गसंधी 3) व्यंजनसंधी 4) यापैकी नाही.

---

26) पुस्तक बिक्रीवर 5% दराने कमिशन याप्रमाणे 800 रुपये कमिशन मिळाले असेल तर, प्रत्येकी 25 रुपये किंमतीची किती पुस्तके विकली असतील ?
(1) 640 (2) 610 (3) 620 (4) 650

---

Click Here To Join Telegram

27) एका आयताची परिमिती 56 सेमी असून त्यांची लांबी 16 सेमी आहे तर त्या आयताचे क्षेत्रफळ चौ. सेमी. असेल ?

(1) 10 (2) 26 (3) 896 (4) 192

28) 675 x 485 = 327375 तर 6.75 x 4:83 = ?

(1) 32.6025 (2) 326.025 (3) 3260.25 (4) यापैकी नाही

29) दोन संख्यांचा गुणाकार 4335 असून त्यांचा लसावि 255 आहे तर त्यांचा मसावि किती ?

(1) 19 (2) 17 (3) 34 (4) 51

30) 18 मजूर रोज 12 तास काम करून एक काम 30 दिवसात संपवितात, तेच काम 20 मजूरांना 36 दिवसात संपवायचे असल्यास रोज किती तास काम करावे लागेल ?

(1) 12 (2) 6.5 (3) 9 (4) 7

31) समान व्यासाच्या 3 नळांनी एका पाण्याची टाकी 45 मिनिटांत 43भरते, जर तेवढ्याच व्यासाचे 5 नळ एकाच वेळी चालू केल्यास ती रिकामी टाकी किती वेळात भरेल ?

(1) 36 मि. (2) 225 मि. (3) 27 मि. (4) 50 मि.

32) द.सा.द.शे. 12% दराने एका रकमेचे 3 वर्षाचे सरळव्याज 648 रुपये येते, तर ती रक्कम कोणती ?

(1) 2100 रु. (2) 1100 रु. (3) 1800रु. (4) 2200

33) एका विक्रे त्याने 20 पेन 750 रुपयास आणले आणि ते सर्व प्रत्येकी 45 रुपये प्रमाणे विकले, तर त्यास होणारा शेकडा नफा अगर तोटा किती ?

(1) शेकडा 20 तोटा (2) शेकडा 20 नफा (3) शेकडा 24 नफा (4) यापैकी नाही.

34) एका बाटलीमध्ये 125 मि.लि. दूध याप्रमाणे अडीच लिटर दूध भरण्यास किती बाटल्या लागतील ?

(1) 20 (2) 16 (3) 18 (4) 25

35) 126 कि.मी. अंतर जाण्यास एका बसला 210 मिनिटे लागतात वेग कायम ठेवल्यास ती बस किती मिनिटात 168 कि.मी. अंतर जाईल ?

(1) 280 (2) 240 (3) 360 (4) यापैकी नाही

36) 5 ने नि:शेष भाग जाणारी खालीलपैकी कोणती संख्या आहे ?

(1) 56824 (2) 9876 (3) 7214 (4) 7885

37) 2, B आणि 8 या संख्या परंपरित प्रमाणात आहेत तर B शोधा.

(1) 6 (2) 5 (3) 4 (4) 3

38) आठ संख्यांचा मध्य 35 आहे. एक संख्या वगळल्यास मध्य 3 ने कमी होतो. तर वगळलेला अंक कोणता ?

(1) 48 (2) 52 (3) 56 (4) 60

39) 15 रुपयांस अडीच डझन चिकू, तर अशा साडेचार डझन चिकुंची किंमत किती ?

(1) 28 रु. (2) 30रु. (3) 27 रु. (4) 25 रु.

40) एका संख्येला 6 ने भागल्यास बाकी 2 उरते व 8 ने भागल्यास बाकी 4 उरते आणि 18 ने भागल्यास बाकी 14 उरते, तर ती संख्या कोणती ·

(1) 72 (2) 76 (3) 68 (4) 44

41) एका आयताकृती मोबाईल संचाची लांबी ही त्याच्या रुंदीपेक्षा 3 सेमी ने जास्त आहे जर परिमिती 34 सेमी असेल तर मोबाईल संचाची लांबी व रुंदी काढा.

(1) 10 व 7 सेमी (2) 6 व 9 सेमी (3) 7 व 4 सेमी (4) 11 व 8 सेमी

42) दोन संख्यांचे गुणोत्तर 3:5 आहे. त्या प्रत्येक संख्येतून 5 वजा केल्यास येणाऱ्या संख्यांचे गुणोत्तर 1:2 येते तर त्या संख्या काढा.

(1) 20, 35 (2) 9, 15 (3) 15, 25 (4) 10,30

43) त्रिकोणाच्या कोनाचे माप 1 : 2 : 3 या गुणोत्तरात आहेत तर प्रत्येक कोनाचे माप काढा.

(1) 20 अंश, 40 अंश, 60 अंश (2) 30 अंश, 60 अंश, 90 अंश
(3) 40 अंश, 80 अंश, 120 अंश (4) 15 अंश, 30 अंश, 45 अंश

44) एका महामार्गावरील A आणि B या दोन ठिकाणामधील अंतर 70 कि.मी. आहे. एक कार A या ठिकाणाहून व दुसरी कार B या ठिकाणाहून निघते, जर त्या एकाच दिशेने चालल्या तर एकमेकींना तासात भेटतात व विरुद्ध दिशेने चालल्यास एका तासात भेटतात तर त्यांचा वेग काढा.

(1) 50, 40 (2) 40, 30 (3) 45, 35 (4) 30, 20

45) 10 वर्षांपूर्वी वडिलांचे वय मुलाच्या त्या वेळच्या वयाच्या 12 पट होते आणि 10 वर्षांनंतर वडिलांचे वय मुलाच्या त्या वेळच्या वयाच्या दुप्पट असेल तर त्यांची आजची वये काढा.

(1) 24, 17 (2) 30, 16 (3) 34, 12 (4) 32, 18

46) 5 पुस्तक व 7 पेन यांची एकत्रित किंमत 79 रु. आहे. तर 7 पुस्तके आणि 5 पेन यांची एकत्रित किंमत 77 रु. आहे, तर एक पुस्तक व दोन पेन यांची किंमत किती ?

(1) 15 (2) 20 (3) 25 (4) 30

47) एका मनुष्यास प्रतिदिन 100 रु. प्रमाणे मजुरी मिळते. जर तो कामावर आला नाही तर त्याचेकडून प्रतिदिन 10 रु. प्रमाणे दंड वसूल केला जातो. माहे एप्रिलमध्ये एकूण 1900 रु. मिळाले तर त्याने किती दिवस काम केले ते काढा.

(1) 24 (2) 16 (3) 20 (4) 22

48) एका वर्तुळाची त्रिज्या ५% ने वाढविल्यास क्षेत्रफळ किती वाढेल?

(1) ५% (2) १०.५% (3) १०.२५% (4) १०%

49) 48 ते 60 पर्यंतच्या सम संख्यांची बेरीज किती ?

(1) 322 (2) 323 (3) 378 (4) 387

50) संजय ला इंग्रजी विषय सोडून इतर ४ विषयात सरासरी ५६ गुण मिळाले तर इंग्रजी विषयाचे गुण मिळविल्यास २ ने वाढते तर इंग्रजीचे गूण किती ?

(1) ७७ (2) ८८ (3)५५ (4) ६६

51) विजोड पद ओळखा. पेरु, डाळिंब, चिकू, बटाटा, फणस

(1) पेरू (2) बटाटा (3) चिकू (4) फणस

52) 3, 5, 9, 15, 23, ? प्रश्नचिन्हाच्या जागी कोणती संख्या येईल?

(1) 25 (2) 15 (3) 33 (4) यापैकी नाही

53) धावणे : थकवा, उपवास : ?

(1) फराळ (2) भूक (3) एकादशी (4) यापैकी नाही

WINNER ACADEMY AMRAVATI

54) गिरिष मैदानावर उभा आहे. प्रथम तो पश्चिमेकडे 10 पावले जातो तेथे डावीकडे वळून 6 पावले चालतो, तेथे उजवीकडून बळून 18 पावले जातो शेवटी उजवीकडे वळून 6 पावले जातो तर तो मुळच्या ठिकाणापासून किती पावलें दूर आहे ?

(1) 28 (2) 34 (3) 40 (4) 24

55) 14 ला 35 तसे 24 ला काय ?

(1) 36 (2) 48 (3) 72 (4) 60

५६) AZ,JQ, EV,LO, ?

(1) KM (2) CX (3) GS (4) FV

57) 6 : 38, 7 : ?

(1) 51 (2) 52 (3) 50 (4) 48

58) ? 51, 50, 48, 45, 41, 36,

(1) 30, 23 (2) 30, 24 (3) 31, 24 (4) 23, 30

59) खालीलपैकी क्रम लावल्यास मध्यभागी काय येईल ? मिनिट, आठवडा, तास, दिवस, सेकंद

(1) आठवडा (2) मिनिट (3) तास (4) दिवस

60) विहीर म्हटले की कोणती बाब आवश्यक आहे ?

(1) रहाट (2) पाणी (3) मोट (4) हौद

61) 2000 या संख्येशी जुळणारा पर्याय ओळखा ?

(1) 40 × 45 (2) 40 x 50 (3) 40x500 (4) 250x40

62) 70 ÷70 x 70 = ?

(1) 1/70 (2) 7 (3) 70 (4) 140

63) एका सांकेतिक भाषेत CBE म्हणजे BAD तर GMBH म्हणजे काय ?

(1) ELOG (2) FLAG (3) GLAD (4) GAIN

64) 5 बंगळे 5 मासे 5 मिनिटात खातात तर 1 बगळा 1 मासा किती मिनिटात खाईल ?

(1) 1 मि. (2) 25 मि. (3) 5 मि. (4) 1/5 मि.

65) 340 पानांच्या पुस्तकावर पान क्रमांक लिहिण्यास 3 हा अंक 'किती वेळा वापरावा लागेल ?

(1) 105 (2) 115 (3) 114 (4) 106

66) वर्षाची सुरुवात जून महिन्याने केल्यास क्रमाने 7 वा महिना कोणता येईल ?

(1) नोव्हेंबर (2) डिसेंबर (3) जुलै (4) जानेवारी

67) रमेश महेशपेक्षा 3 दिवसांनी मोठा आहे. महेशचा जन्म बुधवारी झाल्यास रमेशचा जन्म कोणत्या वारी झाला असेल ?

(1) शनिवार (2) गुरुवार (3) रविवार (4) सोमवार

68) सुहासची काकू उमेशची मामी आहे तर उमेश सुहासचा कोण ?

(1) मामेभाऊ (2) चुलतभाऊ (3) आतेभाऊ (4) मावसभाऊ

69) मुख्यमंत्री : राज्यपाल, ? : राष्ट्रपती

(1) सभापती (2) अध्यक्ष (3) उपराष्ट्रपती (4) पंतप्रधान

70) खालीलपैकी शब्दगटात बसणारा पर्याय निवडा.
मार्च, डिसेंबर, जुलै, ऑगस्ट

(1) सप्टेंबर (2) जून (3) मे (4) नोव्हेंबर

71) एका कॅरम स्पर्धेत 32 स्पर्धक होते. हारणारा स्पर्धक बाद असा नियम होता तर स्पर्धेतील पहिल्या 3 फेऱ्यात ऐकूण किती स्पर्धक बाद होतील ?

(1) 16 (2) 26 (3)28 (4) 22

72) 50 चा 0.02% = ?

(1) 0.1 (2) 0.001 (3) 0.01 (4) 0.02

73) सूर्योदयाकडे तोंड करून रोहीत उभा आहे. तो घड्याळ्याच्या काट्याच्या दिशेत 90 अंश कोनात वळाल्यास त्याचे तोंड कोणत्या दिशेस असेल ?

(1) पूर्व (2) पश्चिम (3) उत्तर (4) दक्षिण

74) अडीच वाजता घड्याळ्याचा मिनिटकाटा व तास काटा यांच्यातील अंशात्मक अंतर किती ?

(1) 120 अंश (2) 105 अंश (3) 180 अंश (4) 25 अंश

75) एका खेळाडूचा खालून क्रमांक 20 वा आणि वरून 25 वा क्रमांक आहे. तर त्या सर्धेत खेळाडू किती ?

1) 44 2) 45 3) 46 4) 43

76) दिल्लीचा सुलतान अल्तमशची मुलगी कोण ?

1) रजिया बेगम 2) ताज बेगम 3) दिलकश 4) यापैकी नाही

77) राजस्थानमधील दिलवारा मंदिर कोणत्या धर्माचे आहे ?

1 ) जैन 2) बौध्द 3) शिख 4) राजपुत

78) दिल्लीहून देवगिरीला राजधानी हलविणारा राजा कोण ?

1) औरंगजेब 2) मोहमद तुघलक 3) मेहमुद गझनी 4) मोहमद घोरी

79) गोबर गॅस संयंत्रामधून कोणता वायू मिळतो ?

1) इथेन 2) मिथेन 3) पेट्रेलियम 4) केरोसिन

80) अग्नीशमन वायू म्हणून कशाचा वापर करतात ?

1) ऑक्सीजन 2) नायट्रोजन 3) कार्बन डायऑक्साइड 4) यापैकी नाही

81) पाण्याचे रेणुसूत्र काय ?

1) $H_2O$ 2) HO 3) $HO_2$ 4) WATER

82) चंपारण्यामधील शेतकऱ्यांचा लढा .........शी संबंधित होता.

1 ) ऊस 2) कापूस 3) भात 4) नीळ

83) तैनाती फौजेची पध्दत कोणी सुरु केली ?

1) लॉर्ड डलहौसी 2) लॉर्ड क्लाइव्ह 3) लॉर्ड वेलस्ली 4) लॉर्ड हेस्टिंग्ज

84) फॉरवर्ड ब्लॉकची स्थापना खालीलपैकी कोणी केली ?

1) लोकमान्य टिळक (2) दादाभाई नौरोजी
(3) सुभाषचंद्र बोस 4) महात्मा गांधी

85) कर्झन वायली यांना गोळी घालून कोणत्या क्रांतिकारकाने ठार केले ?

1) अनंत कान्हेरे 2) खुदीराम बोस 3) मदनलाल धिंग्रा 4) दामोदर चाफेकर

WINNER ACADEMY AMRAVATI

86) जातीय निवाडा या नावाने इतिहासात प्रसिध्द असलेला निवाडा रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी केव्हा जाहीर केला ?
1) 16 ऑगस्ट 1932 2) 17 ऑगस्ट 1932
3) 18 ऑगस्ट 1932 4) 19 ऑगस्ट 1932

---

87) महात्मा गांधी खालीलपैकी कोणत्या गोलमेज परिषदेस हजर होते ?
1) पहिल्या 2) दुसऱ्या 3) तिसऱ्या 4) चौथ्या

---

88) टिपू सुलतानचा मृत्यू कोणत्या युध्दात झाला होता ?
1) हल्दी घाटी 2) प्लासी 3) बक्सार 4) श्रीरंगपट्टण

---

89) कोणत्या पदार्थावर चुंबकीय परिणाम होत नाही ?
1) लोह 2) निकेल 3) कोबाल्ट 4) रबर

---

90) युरियामध्ये कोणता अंश आढळतो ?
1 ) नत्र 2) पलाश (3) लोह 4) यापैकी नाही

---

91) अनुभट्ट्यामध्ये इंधन म्हणून कशाचा वापर करतात ?
1) कोळसा 2) नियॉन 3) युरेनिअम 4) यापैकी नाही

---

92) बहमनी राज्याची स्थापना कोणी केली ?
1) अलाऊद्दीन 2) हसन गंगु 3) महमुद गवान 4) टिपू सुलतान

---

93) महाराष्ट्राचे मार्टिन ल्युथर म्हणून कोणाला ओळखले जाते ?
1) शाहू महाराज 2) आगरकर 3) लोकमान्य टिळक 4) महात्मा फुले

---

94) जिल्हा परिषद अध्यक्षाचा कार्यकाळ किती असतो ?
1) दोन वर्ष 2) अडीच वर्ष 3) तीन वर्ष 4) पाच वर्ष

---

95) हडप्पा व मोहेंजोदडो ही प्राचीन संस्कृतीची ठिकाणे आज कोठे आहेत?
1) भारत 2) पाकिस्तान 3) बांग्लादेश 4) भुतान

---

96) दक्षिणेतील विजयनगर राज्याची राजधानी कोणती होती ?
1) बैंगलोर 2) म्हैसूर 3) हम्पी 4) बिजापूर

---

97) नुकताच जगातील सर्वात मौल्यवान 'ब्रँड' कोणते ठरले ?
1) गूगल 2) ॲपल 3) ॲमेझॉन 4) मायक्रोसॉफ्ट

---

98) नुकताच २६ जाने २०२३ ला महाराष्ट्रातील .....यांना पद्मविभूषणपुरस्कार मिळाला
1) झाकीर हुसेन 2) कुमार मंगलम 3) धीपक धार 4) सुमन कल्याणपूर


---

99) २५ जानेवारी२०२३ ला कितवा राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला?
(1) 12 वा (2) 13 वा (3) 14 वा (4) 15 वा

---

100) 26 जानेवारी 2023 च्या प्रजासत्ताक दिन या दिवशी प्रमुख पाहुणे म्हणून ...... या देशाचे राष्ट्राध्यक्ष अब्देल फतह अल सिसी यांना आमंत्रित केले होते ?
(1) रशिया (2) इस्त्राईल (3) इजिप्त (4) दक्षिण आफ्रिका

---



" तुमची मेहनत प्रामाणिक असली की तुम्हाला यशस्वी होण्यासाठी प्रमाण देण्याची गरज भासत नाही.।।✍ !!
* महाराष्ट्र पोलीस *

YouTube
TheWinnerAcademyAmravati
आमचे व्हिडिओ पाहण्यासाठी सर्च करा.